दैनिक
# राज आज्ञा
सर्व सामान्यांच्या हक्कासाठी
संपादक-राजेश्वर सामुद्रे
9970826333
RNI NO.- MAHMAR/2014/57031
वर्ष १० वे | अंक-१३७ वा | दिनांक- २८ /०२ /२०२४ वार- बुधवार | पाने- ४ | किंमत- २ रुपये

## राज्याची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरवर नेण्याचा निर्धार
# ९ हजार ७३४ कोटी तुटीचा अर्थसंकल्प

**मुंबई :** राज्याच्या २०२४-२५ वर्षाच्या एकूण खर्चासाठी ६ लाख ५२२ कोटी रुपयांची तरतूद असलेला अंतरिम अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत सादर केला. राज्यातील शेतकरी, महिला, कष्टकरी, सर्वसामान्य, दलित-आदिवासी- ओबीसी अशा सर्वच मागास किंवा अतिमागास घटकांसाठी भरीव तरतूद या अर्थसंकल्पात आहे. पायाभूत सुविधा, उद्योग, पर्यावरण आदी सर्वच क्षेत्रांसाठी निधीची उपलब्धता करून देण्यात आली आहे. राज्यावरील कर्जाचा भार ७ लाख ८३ हजार कोटींपर्यंत गेला असून अर्थसंकल्प ९ हजार ७३४ कोटी तुटीचा आहे. मागच्या वर्षी जे महसुली उत्पन्न अपेक्षित होते त्यात २५ हजार कोटींची घट झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशाची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यात महाराष्ट्राचा १ ट्रिलियन डॉलरचा वाटा अपेक्षित आहे. त्यादृष्टीनेही अंतरिम अर्थसंकल्पात पावले टाकण्यात आली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) च्या धर्तीवर मातंग समाजासाठी अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी) स्थापन करण्यात आली आहे. मंत्रालय, विधानभवनसह परिसरातील सर्व शासकीय बंगले तसेच इमारतींचा पुनर्विकास प्रस्तावित असून त्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर



निविदा मागविण्यात येणार आहेत. त्यासाठी साडेसात हजार कोटींचा खर्च अपेक्षित आहे.उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी विधानसभेत, तर शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी विधानपरिषदेत अंतरिम अर्थ संकल्प सादर केला. लोकसभा निवडणुका असल्यामुळे हा चार महिन्यांसाठीचाच अंतरिम अर्थसंकल्प अर्थातच लेखानुदान आहे. केंद्रात नवीन सरकार आल्यानंतर जुलै महिन्यात उर्वरित आठ महिन्यांचा अर्थसंकल्प मांडण्यात येणार असल्याचे अजित पवार म्हणाले. युवक, महिला, गरीब आणि अन्नदाता शेतकरी या चार प्रमुख घटकांसाठी कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. शाश्वत, पर्यावरणपूरक व सर्वसमावेशक विकास साधण्याचे राज्याचे धोरण असून राज्याच्या अर्थव्यवस्थेचे आकारमान १ ट्रिलियन डॉलर्स करण्यासाठी महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेच्या दिशादर्शक अहवालानुसार धोरणांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

**खातेनिहाय प्रास्तवित तरतुदी (कोटी रुपये)** नगरविकास : १० हजार ६२९, सार्वजनिक बांधकाम रस्ते आणि इमारती: २१ हजार ३०३, ग्रामविकास : ९ हजार २८०, गृह, परिवहन आणि बंदरे ४ हजार ९४, सामान्य प्रशासन : १ हजार ४३२, उद्योग : १ हजार २१, सहकार, पणन, वस्त्रोद्योग १ हजार ९५२, पाणीपुरवठा आणि स्वच्छता : ३ हजार ८७५, पर्यावरण आणि वातावरणीय बदल २४५, वने २ हजार ५०७, मृद आणि ,

(पान नं-४ वर)

## थोडक्यात

### विद्युत रोहीत्रातुन ऑईलची चोरी

**राज आज्ञा वृत्तसेवा-**
**शहादा:** रोहीत्रावरुन ऑईल तर विद्युत पोलवरुन तारा चोरीला गेल्याची घटना मोहीदा शिवारात घडली आहे. याप्रकरणी अनोळखीविरुद्ध शहादा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.शहादा तालुक्यातील मोहीदा गावाच्या शिवारात विद्युत रोहीत्र आहे. चोरट्यांनी या रोहीत्रावरुन१९ हजार ८०० रुपयांचे १८० लिटर ऑईल, ११ हजार ६०० रुपयांचे ५८० मिटर ॲल्युमिनिअमची तार चोरुन नेली आहे. याबाबत महावितरण प्रधान तंत्रज्ञ चतुर विनायक नेरपगार यांनी शहादा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अनोळखीविरुद्ध भारतीय विद्युत अधिनियम कायदा कलम १३६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास हेकॉ. वसंत नागमल करीत आहे.

### नंदुरबारा तून दुचाकी लंपास

**नंदुरबार -** रुग्णालयाजवळून दुचाकी चोरीला गेल्याची घटना नंदुरबार येथे घडली आहे. या प्रकरणी अनोळखीविरुद्ध शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यातआला आहे. नवापूर तालुक्यातील मौलीपाडा येथील सैमन महऱ्या पाडवी यांनी नंदुरबार शहरातील एका हॉस्पिटलसमोर दुचाकी (क्र. एमएच ३९ एए ५३७४) केली सभी के दुध होती जावोरट्याने सदरची दुचाकी आहे. याबाबत सैमन महऱ्या पाडवी यांनी नंदुरबार शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अनोळखीविरुद्ध भादंवि कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आफ्रिकन स्वाईन फिवर रोगाच्या संसर्ग केंद्रापासून एक किलोमिटर परिसर बाधित क्षेत्रघोषित- मनिषा खत्री

**राज आज्ञा वृत्तसेवा-**
**नंदुरबार:** अफ्रिकन स्वाईन फिवर या विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भावाचे शहादा तालुक्यातील म्हसावद या ठिकाणचे तपासणी निष्कर्ष होकारार्थी आला आहे. या रोगाचा प्रसार अन्य ठिकाणी होवू नये म्हणून प्राण्यांमधील संक्रमण व सांसर्गिक रोग प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम २००९ नुसार संसर्ग क्षेत्रापासून एक किलोमीटरचा परिसर बाधित क्षेत्र व १० किलोमीटर परिघातील क्षेत्र संनियंत्रण क्षेत्र म्हणून म्हणून घोषित केले असल्याचे आदेशजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन



प्राधिकरणाच्या अध्यक्षा मनीषा खत्री यांनी दिले आहेत.

अफ्रिकन स्वाईन फिवर हा विषाणूजन्य रोग पाळीव व जंगली वराहांमध्ये मोठ्या प्रमाणात पसरणारा सांसर्गिक रोग असून त्याचा संसर्ग सर्व वयोगटातील पाळीव व जंगली वराहांमध्ये होत असतो. या रोगाची लागण किंवा प्रसार बाधित वराहांच्या शरीरातून निघणाऱ्या द्रावण, दुषित खाद्य व चारा तसेच किटकांच्या माध्यमांतून इतर वराहांना होतो. अफ्रिकन स्वाईन फिवर हा विषाणूजन्य रोग वराहां पासून माणसांमध्ये होत नाही, त्यामुळे सदर रोगापासून मानवी आरोग्या साठी धोका नाही. नंदुरबार जिल्ह्यात या विषाणूजन्य रोगाचा पाळीव व जंगली वराहां मध्ये संभाव्य प्रादुर्भावाचा प्रतिबंधात्मक उपयोजनेसाठी जिल्ह्यातील वराह पालन व्यवसायिक, व्यापारी, वराह मांस विक्री केंद्र (कसाई) व नागरिकांनी आप-आपल्या स्तरावर काटेकोरपणे जैवसुरक्षा प्रणालीचा अवलंबन करावा.

**जैवसुरक्षा प्रणालीचा अवलंबन करतांनाया बाबींचा समावेश करावा..**

* बाधित क्षेत्राचा १ किमी परिसरातील सर्व- वराहांचे कलींग करुन त्यांची विल्हेवाट शास्त्रीय पध्दतीने लावुन त्या परिसराचे निजंतुकीकरण करावे. *आफ्रिकन स्वाईन फिवर(एएसएफ) या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी बाधित परिसरात सक्रिय संनिरक्षण व्यापकप्रमाणावर करावे.

(पान नं-४ वर )

## शहादा येथे चर्मकार समाजातील गुणवंतांचा गौरव

**राज आज्ञा वृत्तसेवा-**
**शहादा (का.प्र ) :** चर्मकार समाजाचे आराध्य दैवत संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांच्या ६४७ व्या जयंती निमित्त समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुण गौरव समारंभ तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या समाज बांधवांचा स्मृतिचिन्ह सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

शहादा येथील अन्नपूर्णा लॉन्स येथे गुरु रविदास नोकरदार मैत्री संघा तर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी गिरधर शिंदे होते. याप्रसंगी पो. नि.



शिवाजी बुधवंत, माजी समाजकल्याण सभापती आत्माराम बागले, सेवानिवृत्त गट विकास अधिकारी शांतीलाल शिंदे, सेवानिवृत्त बँक मॅनेजर भाईदास बागुल, गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर गंगाराम बागले, माजी नगरसेवक ज्ञानेश्वर चौधरी, नोकरदार मैत्री संघाचेउपाध्यक्ष सुभाष सावंत, सन्मित्र क्रीडा मंडळाचे अध्यक्ष प्रा. ज्ञानी कुलकर्णी, नाना अहिरे, प्रकाश महाले, एकनाथ वसईकर, दिलीप शिंदे, वामन अहिरे, दिलीप मोरे, भारत अहिरे, मोरन राजभोज उपस्थीत होते.

यावेळी स्वरा सोनवणे हिने बासरीवर राष्ट्रगीत सादर केले. प्रास्ताविक शिवाजी महाले यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सरिता महाले व

(पान नं-४ वर)

# नंदुरबार रेल्वेस्थानकाला चौथा नवीन प्लॅटफार्म मिळणार –खा. डॉ.हिना गावित

**राज आज्ञा वृत्तसेवा-**
**नंदुरबार (रूपेश राजपूत |जिल्हाप्रतिनिधी ):**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लागू केलेल्या अमृत भारत स्टेशन योजनेमुळे नंदुरबार रेल्वे स्थानकाला चौथा नवा प्लॅटफॉर्म मिळणार आहे. तसेच दोन प्लॅटफॉर्मवर लिफ्टची सोय करून मिळेल.

नंदुरबार जिल्ह्या तील दिव्यांग आणि वयोवृद्ध प्रवाशांची सोय व्हावी म्हणून खासदार निधीतून प्लॅट फॉर्मवर फिरू शकणाऱ्या बॅटरी ऑपरेटेड गाड्या उपलब्ध करून देण्यात येतील अशी माहिती खा. डॉ. हिना गावित यांनी दिली.

भारतीय रेल्वे स्थानकांच्या विकासासाठी अमृत भारत स्टेशन योजना अलीकडेच सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत रेल्वे अपग्रेड, आधुनिकी करणासाठी नंदुरबार जिल्ह्या तील नंदुरबार, रनाळे आणि चिंचपाडा या तीन रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या कामाचा ई- शुभारंभ म्हणजे ऑनलाइन शुभारंभ काल करण्यात आला. त्यासाठी नंदुरबार रेल्वे स्थानकाच्या आवारात प्रशस्त सोहळा आयोजित करण्यात आला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑन स्क्रीन सोहळा पार पडला.

यावेळी खा. डॉ.हिना गावित, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा डॉ.



सुप्रिया गावित, भारतीय जनता पार्टीचे महामंत्री विजय चौधरी, भाजपाचे जिल्हाध्यक्ष निलेश माळी, पोलिस अधिक्षक श्रवण दत्त एस, रेल्वे विभागाचे कुशल सिंग, हेमंत महावार, आर. के. रंजन, लखनलाल मीना, अमरेंद्र कुमार, संदीप कुमार, गजेंद्र शर्मा आदी उपस्थित होते. यावेळी खा. डॉ. हिना गावित म्हणाल्या की, नंदुरबार जिल्ह्याच्या विकासासाठी रेल्वे मार्ग किती महत्त्वाचा आहे आणि पहिल्यांदा खासदार बनल्या तेव्हापासून म्हणजे २०१४ पासून रेल्वे सुविधा मिळवून देण्यासाठी त्यांनी किती प्रयत्न केले याविषयी विश्लेषित माहिती दिली. खासदार बनल्यापासून दिल्लीमध्ये पाठपुरावा केला आणि नवीन नवीन रेल्वे गाड्या मंजूर करून दिल्या, लोकलच्या धरतीवर चालणारी मेमो ट्रेनची सेवा मिळवून दिली, अनेक वर्ष रखडलेले उधना भुसावळ रेल्वे मार्गाचे दुहेरीकरण पूर्णत्वास आणून दिले. नंदुरबार रेल्वे स्थानकाचा हेरिटेज लुक कायम ठेवत अनेक आधुनिक सुविधा मिळवून दिल्या.

त्या पाठोपाठ आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातील रेल्वे स्थानकांच्या आधुनिकी करणासाठी लागू केलेल्या अमृत भारत स्टेशन योजने अंतर्गत नंदुरबार रनाळे आणि चिंचपाडा या तीन स्थानकांचा समावेश करण्यात आला असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते त्या कामांचा शुभारंभ करण्यात आला. नंदुरबार रेल्वे स्थानकावर सध्या स्थितीत तीन प्लॅटफॉर्म आहेत आता लवकरच चौथा प्लॅटफॉर्म उभारला नंदुरबार रेल्वे

(पान नं-४ वर)

## विचारधन

*एक हजार लढाई जिंकण्यापेक्षा स्वतःवर विजय मिळवणे हे अधिक चांगले आहे. कारण स्वतःवर विजय मिळवला तर सर्व काही जिंकता येते. ते तुमच्याकडून कोणीच हिरावून घेऊ शकत नाही.* - भगवान गौतम बुद्ध

# शहादा जायन्टसचे पदग्रहण उत्साहात संपन्न

**राज आज्ञा वृत्तसेवा-**

**शहादा (का.प्र) :** जायन्टस ग्रुप शाहदा व जायन्टस सहेली ग्रुप शहादा यांच्या पदाधिकाऱ्यांच्या पदग्रहण समारंभ समता भुवन येथे उत्साहात संपन्न झाला.

या ग्रुपने शहाद्यात वृक्षारोपण, आरोग्य शिबीर, रक्तदान शिबिर, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, उन्हाळ्यात टोपी व चप्पल वाटप, थंडीत ब्लँकेट वाटप, व्यसन मुक्ती जनजागृती, अवयवदान जनजागृती, विज पाणी बचती बाबत जनजागृती , प्लॅस्टिक हटाव संदर्भात जनजागृती अनेक शाळेत चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निर्बंध स्पर्धा असे भरीव कामगिरी करुन नाव लौकिग मिळविला आहे. अश्या समजसेवा करणाऱ्या शहादा जायन्टस च्या अध्यक्षपदी डॉ विवेक नगीन पाटील यांची तर जायन्टस सहेलीच्या अध्यक्षपदी सौ स्वाती विवेक पाटील यांच्या सह उपाध्यक्ष डॉ राजेश जैन , हितेश सोनार, सचिव डॉ सुभाष पाटील खजिनदार सोमेश्वर सोनार सहेली उपाध्यक्षा आशा चौधरी , प्रिती सोनार, साचिव मनिषा भावसार खजिनदार सिमा सोनार यांनीही शपथ घेतली. या कार्यक्रमास फेडरेशनच्या अध्यक्षा चंद्रकला जगताप, फेडरेशन सचिव रेखा राजपुत सेंट्रल कमेटी मेंबर रविंद्र जमादार प्रा. आर टी पाटील, माजी अध्यक्ष संगिता पाटील,



फेडरेशन डायरेक्टर कैलास भावसार,फेडरेशन आमंत्रित सदस्य माणक चौधरी , जोस्ना पवार ,हिरकानी ग्रुपच्या अध्यक्षा विजया मोरे, दामिनी ग्रुपच्या अध्यक्षा अर्चना निकुम्भे डॉ एच एम पाटील, अरुणा पाटील आदी उपस्थित होते.

या कार्यक्रम चंद्रकला जगताप, रेखा राजपुत, रविंद्र जामदार, प्रा आर टी पाटील, ज्योस्ना पवार यांनी मार्गदर्शन केले. या वेळीं के के सोनार, हितेश सोनार, सोमेश्वर सोनार, प्रिती सोनार, सिमा सोनार, अर्चना सोनार दिपाली बाविस्कर, रेखा पाटिल मनिषा भावसार, भरत पाटील, शशिकांत पाटील, प्रा नगिन पाटील, नरेंद्र पाटील, डॉ लकेशकुमार, डॉ अतुल शाह, डॉ निलेश लढढा आदी उपस्थित होते.




## जनमत

**( सर्व सामान्यांसाठी खुले व्यासपीठ )**

आपल्या मराठी भाषेत, आपल्या परिसरातील समस्या अथवा समस्यांचे छायचित्रासह कमाल शब्दात व्यक्त करून लेखी स्वरुपात,
ई - मेलनेअथवा दैनीक राज आज्ञा वृत्तपत्राच्या कार्यालयात अवश्य पाठवा !
सोबत खालील प्रमाणे माहिती भरून पाठवा.

नांव : ----------------------------------------

जन्म तारीख : ----------------------------------------

पत्ता : ----------------------------------------

मोबा / फोन नं ________________________________

तुमचा ई-मेल - ________________________________

• अधिक माहितीसाठी संपर्क •
मुख्य संपादक
राजेश्वर सामुद्रे, मो.९९७०८२६३३३
Email-editor.rajaadnya.ndb@gmail.com

**कार्यालय**
**" राजगड " यूनियन बैंक जवळ, शहादा. जि,नंदुरबार**







## नोकरी विषयक

**भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी मेडिकल कॉलेज मध्ये विविध पदांच्या एकूण ५९ जागा**
भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल पुणे यांच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या एकूण ५९ जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्रताधारक असणाऱ्या उमेदवारांकरिता मुलाखती…

**बीड जिल्ह्यात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध पदांच्या ५४ जागा**
राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा रुग्णालयाच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या एकूण ५४ जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्रताधारक असणाऱ्या उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत…

**राज्यातील विविध शाळेतील विविध शिक्षक पदांच्या एकूण २१६७८ जागा**
राज्यातील विविध जिल्हा परिषद, खासगी अनुदानित, महापालिका, नगरपालिका, नगर परिषद शाळांमधील शिक्षक पदांच्या एकूण २१६७८ जागा भरण्यासाठी भरती प्रक्रिया राबविण्यासाठी…

**युनियन बँक ऑफ इंडिया यांच्या आस्थापनेवर विविध पदांच्या ६०६ जागा**
युनियन बँक ऑफ इंडिया यांच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या एकूण ६०६ जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्रताधारक असणाऱ्या उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात…

**खडकी (पुणे) उच्च स्फोटक कारखान्यात विविध पदांच्या एकूण ९० जागा**
उच्च स्फोटक कारखाणा, खडकी, पुणे यांच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या एकूण ९० जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्रताधारक असणाऱ्या उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज…

**पंजाब नॅशनल बँकेच्या (PNB) आस्थापनेवर विविध पदांच्या १०२५ जागा**
पंजाब नॅशनल बँक (PNB) यांच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या एकूण १०२५ जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्रताधारक असणाऱ्या उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात…

**सचिन ढवळे अकॅडमीत MPSC/ तलाठी भरती ऑनलाईन कोर्स उपलब्ध**
पुणे येथे सचिन ढवळे अकॅडमीत पुढील प्रमाणे विविध ऑनलाईन बॅच/ कोर्सेस उपलब्ध करून देण्यात येत असून त्यासाठी अतिशय अल्पदरात प्रवेश…

**EdCIL इंडिया यांच्या आस्थापनेवरील शिक्षक पदाच्या एकूण १०० जागा**
ईडीसीआयएल इंडिया लिमिटेड यांच्या आस्थापनेवरील शिक्षक पदांच्या एकूण १०० जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्रताधारक असणाऱ्या उमेदवारांकडू ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत…

**भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडच्या आस्थापनेवर विविध पदांच्या ५५ जागा**
बीईएल (भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड) यांच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या एकूण ५५ जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्रताधारक असणाऱ्या उमेदवारांकडून विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात…

**भारतीय आर्मी यांच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या एकूण ३७९ जागा**
भारतीय आर्मी (Indian Army) यांच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या एकूण ३७९ जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्रताधारक असणाऱ्या उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात…

**मिरा-भाईंदर महापालिकेच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या २९ जागा**
मिरा-भाईंदर महापालिका यांच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या एकूण २९ जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्रताधारक असणाऱ्या उमेदवारांकडून विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहेत….

**कोल्हापूर जिल्हा राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत विविध पदांच्या ३९ जागा**
राष्ट्रीय आरोग्य अभियान, कोल्हापूर यांच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या एकूण ३९ जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्रताधारक असणाऱ्या उमेदवारांकडून विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात…

**औरंगाबाद पाटबंधारे विभागाच्या आस्थापनेवर विविध पदांच्या १० जागा**
पाटबंधारे विभाग, औरंगाबाद यांच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या एकूण १० जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्रताधारक असणाऱ्या उमेदवारांकडून विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत…

**खडकी येथील दारूगोळा कारखान्यात प्रशिक्षणार्थी पदांच्या ५० जागा**
दारूगोळा कारखाना (गोला बारूद निर्माणी), खड़की, पुणे यांच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या एकूण ५० जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्रताधारक असणाऱ्या उमेदवारांकडून विहित…

**तेल आणि नैसर्गिक वायू महामंडळामध्ये विविध पदांच्या एकूण २२ जागा**
तेल आणि नैसर्गिक वायू महामंडळ मर्यादित (ONGC) यांच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या एकूण २२ जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्रताधारक असणाऱ्या उमेदवारांकडून ऑनलाईन…

**युको कमर्शियल बँकेच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या एकूण ११ जागा**
युनायटेड कमर्शियल बँक (UCO) यांच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या एकूण ११ जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्रताधारक असणाऱ्या उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात…

**अमरावती महावितरण कंपनीच्या आस्थापनेवरील रिक्त पदांच्या ५६ जागा**
महावितरण अमरावती यांच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या एकूण ५६ जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्रताधारक असणाऱ्या उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत….

**नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवर विविध पदांच्या ११० जागा**
नवी मुंबई महानगरपालिका, मुंबई यांच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या एकूण ११० जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्रताधारक असणाऱ्या उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत…

**पुणेच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठात प्राध्यापक पदांच्या एकूण १११ जागा**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या एकूण १११ जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्रताधारक असणाऱ्या उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात…

## पान १ वरून....

### ९ हजार ७३४ कोटी तुटीचा अर्थसंकल्प

जलसंधारण ४ हजार २४७ ऊर्जा ११ हजार ९३४, कृषी ३ हजार ६५०, पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्यव्यसाय: ५५५, फलोत्पादन : ७०८, मदत आणि पुनर्वसन : ६३८, जलसंपदा, लाभक्षेत्र आणि खारभूमी : १६ हजार ४५६, महिला आणि बालविकास : ३ हजार १०७, वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये २ हजार ५७४, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण : ३ हजार ८२७, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य : १८ हजार ८१६, आदिवासी विकास १५ हजार ३६०, इतर मागासवर्ग बहुजन कल्याण आणि अल्पसंख्याक विभाग ५ हजार १८०, गृहनिर्माण १ हजार ३४७, दिव्यांग कल्याण : १ हजार ५२६, कामगार १७१, अन्न आणि नागरी पुरवठा ५२६, क्रीडा : ५३७, उच्च आणि तंत्रशिक्षण २ हजार ९८, शालेय शिक्षण २ हजार ९५९ कौशल्य, नाविन्यता, रोजगार उद्योजकता विकास ८०७, सांस्कृतिक कार्य: १ हजार १८६, पर्यटन १ हजार ९७३, महसूल : ४७४, विधी आणि न्याय: ७५९, गृह (पोलीस) २ हजार २३७, राज्य उत्पादन शुल्क : १५३, वित्त विभाग : २०८ कोटी, नियोजन विभाग : ९ हजार १९३, रोजगार हमी योजना : २ हजार २०५, माहिती आणि तंत्रज्ञान ९२०, माहिती आणि जनसंपर्क तसेच विधानमंडळ सचिवालय प्रत्येकी ५४७, तर मराठी भाषा विभाग: ७१ कोटी रुपये.

### नंदुरबार रेल्वेस्थानकाला चौथा नवीन प्लॅटफार्म मिळणार -खा. डॉ.हिना गावित

स्थानकावर इकडच्या बाजूने तिकीट खिडकीची एकच सोय आहे. आता रेल्वे स्थानकाच्या पलीकडच्या बाजूने आणखी तिकीटखिडकी सुरू केली जाणार असून रेल्वे पट्ट्याच्या पलीकडील सर्वलोकांना त्याचा लाभ होईल. वृद्ध आणि वयस्कर प्रवाशांची सोयव्हावी म्हणून दोन प्लॅटफॉर्मवर लिफ्ट बसवण्यात येणार आहे.त्याचबरोबर खासदार निधीतून प्लॅटफॉर्मवर फिरणाऱ्या बॅटरीऑपरेटेड गाड्या लवकरच उपलब्ध करून देईन ज्यामुळे ओझेघेऊन आलेल्या वयस्करांची आणि दिव्यांग प्रवाशांची सोय होईल.दुचाकी चोरी आणि तत्सम गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी संपूर्ण रेल्वे स्थानक परिसरात तसेच रेल्वे स्थानकात सर्वत्र सीसीटीव्हीकॅमेरे लावले जातील. अमृत भारत स्टेशन योजनेतून अशा सर्वप्रकारचे लाभ प्रवाशांना मिळणार असून त्यासाठी ११ कोटीरुपयांचा निधी मोदी सरकारने मंजूर केला आहे. अधिक आधुनिकसोयी सुविधा प्राप्त करून देण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत,असेही खा.डॉ. हिना गावित सांगितले.

भारतीय जनता पार्टीचेमहामंत्री विजय चौधरी यांनी देखील मोदी सरकारमुळे तसेचखा.डॉ. हिना गावित यांच्या प्रयत्नामुळे होत असलेल्या विकासकामांचा उल्लेख करून खा. डॉ. हिना गावित यांच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी जि.प.अध्यक्षा डॉ. सुप्रिया गावित यांनीही मनोगतव्यक्तकेले.

### आफ्रिकन स्वाईन फिवर रोगाच्या संसर्ग केंद्रापासून एक किलोमिटर परिसर बाधित क्षेत्रघोषित-मनिषा खत्री

व सुयोग्य जैवसुरक्षा उपाययोजना कराव्यात. पाळीव तसेच जंगली वराहातील अनियमित मर्तुकीवर बारकाईने लक्ष ठेवावे.* वराहपालन करणारे पशुपालक वा व्यवसायासंबंधित व्यक्ती (उदा. व्यापारी, कसाई, वितरक ई.) यांच्यामध्ये या रोगाविषयी जागृकता निर्माण करुन रोगाच्या प्रादुर्भावाविषयी सुचना देणे व सुप्त संनिरीक्षण करण्यासाठी अवगत करावे.वराहाच्या मासांची विक्री करणाऱ्या आस्थापनाची नोंदणी करण्याची प्रक्रिया पूर्ण करुन त्या आस्थापनांना स्थानिक पशुवैद्यकांनी नियमितपणे भेटी देवून नियंत्रण ठेवावे. तसेच मोकाट पध्दतीने होणारे वराह पालन टाळावे. घरगुती तसेच हॉटेलमध्ये वाया गेलेले, शिल्लक राहीलेले अन्न वराहांना देणे ही याच विषाणुच्या प्रसारास मुख्यत्वे करुन कारणीभूतअसल्याने अशा प्रकारचे खाद्य देणे टाळणे गरजेचे असून निरोगी वराहाचा घरगुती व कत्तलखान्यातील कच्चे मांस उपपदार्थ तसेच कचरा यांच्याशी संपर्क येवू देवू नये.* वराहपालन केंद्रातील तसेच वराह मांसविक्री केंद्रातील कचरा एकत्रित साठवु नये.सर्व कचरा नष्ट करावा अथवा त्याचीसार्वजनिक कचरा व्यवस्थापनाकडून शास्त्रोक्तदृष्ट्या योग्य रितीने विल्हेवाट लावावी.* पशुसंवर्धन विभागातील क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी पोलीस व चेकनाके यांच्याशी समन्वय ठेवुन शेजारील राज्यातील वराहाची अनधिकृत प्रवेश होणार नाही, यांची दक्षता घ्यावी.

### शहादा येथे चर्मकार समाजातील गुणवंतांचा गौरव

प्रतिभा डोळे यांनी केले. आभार प्रवीण भामरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी रविदास नोकरदार मैत्री संघाचे सहकारी ब्रिजलाल वसईकर, रवींद्र कुवर, प्रल्हाद राजभोज, प्रा. विजय डोळे, संजय बोरसे, दिनेश बागुल, नामदेव सोनवणे, प्रवीण भामरे, किशोर महाले, प्रवीण अहिरराव, प्रवीण शिंदे, नंदलाल वसईकर, चेतन गांगुर्डे, राहुल अहिरे, दिलीप मोरे यांनी परिश्रम घेतले.

## तळोदा आरोग्य शिबिरात १२० रुग्णांची तपासणी



**राज आज्ञा वृत्तसेवा-**
**तळोदा ( राकेश पवार | प्रतिनिधी ) :** तालुक्यातील धवळीविहिरी येथे सेवाभावी संस्था सहयोग सोशल ग्रुप व राष्ट्रीय सेवा योजना यांचे संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले या शिबिरात 120 रुग्णांची आरोग्य तपासणी करून त्यांना औषधांचे वाटप करण्यात आले, डॉक्टर भीमसिंग गिरासे, डॉक्टर परेश वाणी यांनी या शिबिरात रुग्णांची तपासणी करून त्यांना योग्य त्या औषधांचे वाटप करण्यात आले,, याप्रसंगी सहयोग सोशल ग्रुपचे अध्यक्ष एडवोकेट अल्पेश जैन यांनी विद्यार्थी विद्यार्थिनी ग्रामस्थ यांना व्यसनमुक्तीची शपथ दिली व्यसनामुळे घरादाराची राख रांगोळी होते कुटुंब उध्वस्त होते त्यामुळे व्यसनमुक्तीची शपथ घेऊन ही चळवळ घराघरातून राबविण्यात यावी अशी अपेक्षा त्यांनी याप्रसंगी मार्गदर्शन करताना व्यक्त केली आजच्या धकाधकीच्या जीवनात आपण बाजारात मिळणारे वाटेल ते खाद्यपदार्थ खातो त्यामुळे आपले आरोग्य बिघडते व आपण आजाराला बळी पडतो याबाबत खाण्यापिण्यासंबंधी योग्य आहार घेण्याबाबत मार्गदर्शन डॉ. परेश वाणी यांनी केले या कार्यक्रमास रा. से. यो.चे कार्यक्रमाधिकारी प्रा रामचंद्र परदेशी सहाय्यक कार्यक्रमाधिकारी प्रा. निलेश गायकवाड ,रमेश कुमार भाट, कुशल जैन, हरेश भरवाड, चेतन धनका नितीन पाटील, प्रकाश बोरसे, सुषमा सूर्यवंशी , पंकज पवार भावेश कोळपे ,वैशाली जाधव यांचे सह विद्यार्थी विद्यार्थिनी प्राध्यापक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. धवळीविहार सारख्या दुर्गम आदिवासी परिसरात सहयोग सोशल ग्रुप व समाजकार्य महाविद्यालयाच्या माध्यमातून रुग्णांना गावातच आरोग्य सुविधा मिळाल्याने ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त करण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रावण पाडवी यांनी तर आभार प्रदर्शन इब्राहिम वळवी यांनी केले कार्यक्रमास ग्रामस्थ विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आमलाड येथे मतदार जनजागृती चा कार्यक्रम संपन्न



**रराज आज्ञा वृत्तसेवा-**
**तळोदा ( राकेश पवार | प्रतिनिधी ) :** संस्कृती बहुउद्देशीय सेवा मंडळ व नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने संत रविदास महाराज यांच्या जयंतीच्या औचित्यावर सखोल मतदार जनजागृती मोहिमे अंतर्गत आमलाड येथे गृहपाल सुनील जीवणे यांच्या अध्यक्षतेखाली विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते संत रविदास महाराज व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.यावेळी मतदार जनजागृती चे महत्व शशिकांत नगराळे यांनी मनोगतातून व्यक्त करत.राष्ट्र उभारणीत युवकांचे महत्व या विषयी मार्गदर्शन केले.यावेळी युवकांची उपस्थिती लक्षणीय होती. गृहपाल इरफान खाटीक, नेहरू युवा केंद्र चे स्वयंसेवक नितीन वळवी, विनोद माळी, प्रवीण अहीरे,उदय मगरे, सुनील वळवी, किसन वसावे, जितेंद्र वळवी, सबसेमनं चे अध्यक्ष मिलिंद धोदरे आदी मान्यवरासह युवक मोठया संख्येने उपस्थित होते.

## तळोदा तालुक्यात स्थलांतरित मजूर परतू लागल्याने गावे गजबजली

**राज आज्ञा वृत्तसेवा-**
**तळोदा ( राकेश पवार | प्रतिनिधी ) :** रांझणी: तळोदा तालुक्यातील रांझणी, रोझवा,रोझवा पुनर्वसन,गढीकोठडा,कोठार,पाडळपूरसह इतर गावातील हातमजुरी तसेच ऊसतोड काम करणारे कामगार मोठ्या संख्येने पुणे, सातारा, पंढरपूर तसेच गुजरात, सौराष्ट्र येथे दरवर्षी स्थलांतरित होत असतात. आता तिकडे सर्व कामे अंतिम टप्प्यात आली आहेत तर काही ठिकाणी ती पूर्णत्वास आल्याने हे स्थलांतरित मजूर आता गावाकडे परतू लागले असून त्यामुळे गावे गजबजू लागली असल्याचे चित्र आहे. यावर्षी गुजरात राज्यात तसेच नंदुरबार जिल्ह्यातही उसाचे प्रमाण कमी असल्याचे सांगण्यात येत असून त्यामुळे ऊसतोड लवकरच पूर्णत्वास आली आहे तसेच सौराष्ट्रात रब्बी पिकांची काढणी ही बऱ्याच प्रमाणात झाली असून आपआपला हिशोब करून इतर कामगार ही गावाकडे परतले असल्याचे चित्र आहे . दरम्यान आता स्थलांतरित मजुरांकडून मोठ्या प्रमाणावर आपले अपूर्ण घरकुल तसेच नवीन घरे बांधणे, यासह घराची डागडुजी या कामांना प्राधान्य दिले जात असून त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर तळोदा येथून बांधकाम साहित्य मागवण्यात येऊन आपल्या घरांचे काम पूर्ण करण्यासाठी लगबग सुरू असल्याचे चित्र आहे . तसेच काही स्थलांतरितांकडून आपापल्या तरुण मुला-मुलींचे सोयरिक जमवून लग्न उरकवण्याची तयारी सुरु असल्याचे सांगण्यात येत आहे. एकंदरीत हातात दोन पैसे असल्याने त्या पैशांच्या विनियोग या स्थलांतरितांकडून योग्य ठिकाणी करण्यात येत असून त्यांच्याकडून विविध शासकीय योजनांच्या लाभ मिळवण्यासाठीही प्रयत्न सुरु आहेत.राहाची अनधिकृत प्रवेश होणार नाही, यांची दक्षता घ्यावी.

## प्रथम कब बुलबुल जिल्हास्तरीय स्पर्धा संपन्न



**राज आज्ञा वृत्तसेवा-**
**शहादा** :दि 23/02/2024 रोजी राजे शिवाजी विद्यालय नंदुरबार येथे प्रथम कब बुलबुल जिल्हास्तरीय स्पर्धा घेण्यात आले या स्पर्धेत जि प शाळा कलमाडी त बो ता.शहादा जिल्हा नंदुरबार येथील कब युनिट मास्टर श्री चेतन मधुकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 19 विद्यार्थ्यांचा जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभाग नोंदविण्यात आला. नंदुरबार जिल्ह्यात प्रथमच भारत स्काऊट गाईड तर्फे कब बुलबुल जिल्हास्तरीय महोत्सव आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांसाठ सांस्कृतिक कार्यक्रम मनोरे रंग भरणा गोणपाट शर्यत इत्यादी स्पर्धा घेण्यात आल्या तसेच या स्पर्धेत गोणपाट शर्यत मुले प्रथम क्रमांक भावेश दिनेश गोसावी तसेच गोणपाट शर्यत मुली द्वितीय क्रमांक सतीना संजय पवार व उत्तेजनार्थ राधिका रघुनाथ वडार या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. सर्व विद्यार्थ्यांना सहभागी प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरवण्यात आले. तसेच कब युनिट मास्टर श्री चेतन मधुकर शिंदे यांना प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले

## गोळीबार सराव ईदगाह मैदानावर मनाई आदेश

**राज आज्ञा वृत्तसेवा-**
**नंदुरबार** : सन २०२३-२०२४ वार्षिक गोळीबार सराव दि.२३ फेब्रुवारी २०२४ ते दि. २७ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत तसेच दि. ४ माच २०२४ ते ६ मार्च २०२४ रोजी नंदुरबार शहरातील बिलाडी रोड, ईदगाह मैदानाजवळ, नंदुरबार येथे घेण्याबाबत जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी परवानर्ग दिली आहे. त्याअन्वये सदर प्रतिबंधित क्षेत्रात गोळीबा- सराव दरम्यान पोलीस अधिकारी व अंमलदार यांच व्यतिरिक्त कोणासही प्रवेश करण्यास मनाई आदेश जार केलेला आहे. त्याअनुषंगाने नंदुरबार जिल्हा व ईदगाह मैदानाजवळील भागातील नागरिकांना सूचित करण्यात येते की, दि.२३ ते दि. २७ तसेच दि. ०४ ते ०६ दरम्यान नमुद गोळीबार सरावादरम्यान प्रतिबंधित क्षेत्रात/परिसरात नागरिकांनी फिरू नये, गुरे चारणाने गुराखी यांनी देखील या भागात येऊ नये, तसेच जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी जारी केलेल्या मना आदेशाचे पालन करावे व जिल्हा पोलीस दलास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले




हे पत्रक,मालक,प्रकाशक व संपादक राजेश्वर हिरामण सामुद्रे यांनी दिनेश दामोदर नेरपगार यांच्या मालकीचे प्रेरणा ऑफसेट ॲण्ड कॉम्प्युटर २६, के. एस. पाटील मार्केट शहादा, ता.शहादा जि.नंदुरबार ४२५४०९ (महाराष्ट्र) येथे छापून सिद्धार्थ नगर, कुकडेल, ता.शहादा जि.नंदुरबार ४२५४०९ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक राजेश्वर हिरामण सामुद्रे. वृत्तपत्रातील लेखाशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद शहादा न्यायालयांतर्गत राहतील.

कृपया शुभेच्छा जाहिरात,
इतर सर्व प्रकारच्या व्यवसायिक
जाहिरात प्रसिद्धीसाठी,
बातम्या प्रसिद्धीसाठी
संपर्क साधावा.

Email- editor.rajaadnya.ndb@gmail.com

ऑनलाईन अंकासाठी-
www.rajaadnya.com

संपर्क

राजेश्वर सामुद्रे- संपादक मोबा. 9970826333
रूपेश राजपूत - जिल्हा प्रतिनिधी, मोबा.8788867304

# दैनिक राजआज्ञा

संपर्क- "राजगड" टॅक्सी स्टँड जवळ, युनियन बँक शेजारी,
शहादा ता.शहादा जि. नंदुरबार- 425409